# प्रकरण – ९ : भारताचे १९९१ पासूनचे आर्थिक धोरण

## प्रस्तावना :

भारतीय अर्थव्यवस्था आर्थिक संकटातून जात होती. विदेशी चलनाचा साठा जून १९९१ मध्ये कमी झाला. त्यातून दोन आठवड्यापर्यंतच आयात करणे शक्य होते. ऑगस्ट १९९१ मध्ये चलनवाढ १६.७% पर्यंत पोहोचली होती.

संरक्षण व्यवस्थेवर होणारा खर्च, अनुदान, कर्जावरचे व्याज इत्यादींमुळे सरकारचा खर्च महसूलापेक्षा जास्त होता. समाजवादी व्यवस्थेचे समाजावर होणारे सकारात्मक परिणाम कमी होत गेले. या पार्श्वभूमीवर नवीन बदल आणणे गरजेचे होते. म्हणून भारत सरकारने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारले.

१९८५ मध्ये सुरू झालेल्या आर्थिक बदल स्वीकारण्याच्या प्रक्रियेत १९९१ मध्ये चालना मिळाली. नवीन औद्योगिक धोरण जाहीर करून त्यामध्ये आमूलाग्र बदल सुचविले गेले. या नवीन धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्था नोकरशाहीचे अनावश्यक नियंत्रण आणि क्लिष्ट शासकीय प्रक्रियांपासून मुक्त झाली. नवीन औद्योगिक धोरणानुसार शासन नियंत्रकाच्या आणि नियामकांच्या भूमिकेत न राहता सुविधा पुरविणारे, समन्वय साधणारे, प्रेरणा देणारे आणि पर्यवेक्षकाची भूमिका पार पाडणारे होते.

## १९९१ च्या आर्थिक धोरणाची मुख्य उद्दिष्ट्ये :

१) भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण करणे.

२) चलनवाढीचा दर कमी करणे.

३) आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल सुधारणे.

४) उच्च आर्थिक वृद्धीदर प्राप्त करणे.

५) विदेशी चलनाच्या साठ्यात पुरेशी वाढ करणे.

६) वित्तीय तूट कमी करून आर्थिक स्थैर्य प्राप्त करणे.

७) कोणत्याही निर्बंधाशिवाय वस्तूंचा मुक्त प्रवाह होण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यापार संबंध प्रस्थापित करणे.

८) खाजगी क्षेत्राच्या सहभागात वाढ करणे.

## १९९१ च्या आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये :

**१) औद्योगिक परवाना धोरणात शिथिलता :** कोणताही उद्योग सुरू करण्यासाठी औद्योगिक परवाना धोरणात शिथिलता करण्यात आली. नवीन आर्थिक धोरणानुसार त्यावेळच्या सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले १८ उद्योग वगळता इतर उद्योगांना परवानामुक्त करण्यात आले होते. सध्या मात्र चार उद्योगांना परवाना सक्तीचा करण्यात आला आहे. ते उद्योग खालीलप्रमाणे :

१) सर्व प्रकारची संरक्षण साधने

२) औद्योगिक स्फोटके

३) धोकादायक रसायने, औषध निर्मिती उद्योग

४) तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ

**२) मक्तेदारी व निर्बंधित व्यापार नियंत्रण कायद्याचे उच्चाटन (MRTP) :** मक्तेदार व निर्बंधित व्यापार नियंत्रण कायद्याअंतर्गत मोठ्या उद्योगांची स्थापना, विस्तार, विलीनीकरण इत्यादींसाठी केंद्र सरकारची संमती घेणे सक्तीचे होते. त्यामुळे उद्योगांचा वृद्धीदर मंदावला होता. आता हा कायदा रद्द झाल्याने उद्योगांची वाढ होण्यास मदत झाली आहे.

**३) लघु उद्योगांना प्रोत्साहन :** सरकारने लघु उद्योगांना उत्पादन, रोजगार व निर्यात क्षेत्रात उच्च वृद्धीदर वाढविण्यासाठी प्रोत्साहन दिले. या उद्योगातील गुंतवणूक मर्यादा एक कोटी रुपयांपासून पाच कोटी रूपयांपर्यंत वाढविण्यात आली.

**४) विदेशी गुंतवणुकीला प्रोत्साहन (FDI) :** १९९१ च्या औद्योगिक धोरणात उच्च प्राधान्यक्रम असणाऱ्या उद्योगांमध्ये अधिक गुंतवणूक व नवीन तंत्रज्ञान प्राप्त होण्यासाठी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीला (FDI) मान्यता देण्यात आली. प्रारंभी विदेशी प्रत्यक्ष गुंतवणुकीची मर्यादा ५१ टक्क्यांपर्यंत होती. ही मर्यादा नंतर ७४ टक्क्यांपर्यंत तर बऱ्याच उद्योगांसाठी ती १०० टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आली.

५) **सार्वजनिक क्षेत्राची मर्यादित भूमिका :** उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सार्वजनिक क्षेत्राच्या धोरणात अनेक बदल करण्यात आले आहेत

अ) अनेक क्षेत्रांतील राज्य सरकारची मक्तेदारी संपुष्टात आणणे

ब) सार्वजनिक क्षेत्राची कार्यक्षमता वृद्धींगत करणे.

क) सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उद्योगातील भांडवल काढून घेणे

नवीन आर्थिक धोरणात खाजगीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी सार्वजनिक धोरणातील उद्योगांची संख्या सुरुवातीला सतरा वरून आठवर आणण्यात आली होती ती आता तीनवर आणली आहे. २०१४ पासून रेल्वे व अणुऊर्जा या दोन उद्योगांना सार्वजनिक क्षेत्रात राखीव ठेवण्यात आले आहे.

६) **व्यापाराचे उदारीकरण :** आयात-निर्यात धोरणानुसार आयात व निर्यात परवानासाठी असलेली नियंत्रणे शिथिल करण्यात आली. जवळजवळ सर्व भांडवली वस्तू, कच्चा माल, मध्यम वस्तू व इतर घटकांची मुक्तपणे आयात करण्याची परवानगी देण्यात आली. विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने स्थापन केले. त्याचप्रमाणे कृषीमालाच्या निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी कृषी निर्यात क्षेत्र (AEZ) ही संकल्पना आणली.


७) **विमा क्षेत्रातील सुधारणा :** विमा क्षेत्रात सरकारची मक्तेदारी होती. नवीन धोरणानुसार सुधारणा करण्यासाठी १९९९ मध्ये विमा नियंत्रण व विकास प्राधिकरण कायदा (IRDA) मंजूर करण्यात आला. या कायद्यान्वये खाजगी क्षेत्रातील बहुसंख्य कंपन्यांना विमा व्यवसाय सुरू करण्याची परवाना देण्यात आला. यामुळे विमा क्षेत्रातील शासनाची मक्तेदारी संपुष्टात आली.

८) **वित्तीय क्षेत्रातील सुधारणा :** सुरुवातीला फक्त सार्वजनिक व सहकारी बँकांना वित्तीय क्षेत्रात व्यवसाय करण्याची परवानगी होती. आता मात्र नवीन आर्थिक धोरणानुसार खाजगी व विदेशी बँकांना वित्तीय क्षेत्रात व्यवसाय करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

**शोधा पाहू :**

खाजगी बँका व विदेशी बँका यांची प्रत्येकी पाच नावे शोधा.

### नवीन आर्थिक धोरणाचे घटक :




### अ) उदारीकरण (Liberalisation) :



आकृती ९.१ उदारीकरण

**अर्थ :** अर्थशास्त्रात उदारीकरण या शब्दाचा अर्थ आर्थिक स्वातंत्र्य किंवा आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य होय. उत्पादक, उपभोक्ते, उत्पादनाचे घटक व मालक त्यांच्या स्वहितासाठी मुक्तपणे निर्णय घेऊ शकतात. अर्थशास्त्रज्ञ ॲडम स्मिथ यांनी त्यांच्या 'राष्ट्राची संपत्ती' (Wealth of Nation) या पुस्तकात असे सांगितले की, आर्थिक उदारीकरण हे एक उत्तम आर्थिक धोरण असून ते आर्थिक वृद्धी व लोककल्याणासाठी प्रोत्साहन देणारे आहे.

बाजारयंत्रणा आणि मुक्त स्पर्धेच्या कार्यप्रणालीतील प्रतिबंध कमी करून आर्थिक विकासाला चालना देणारे धोरण म्हणजे आर्थिक उदारीकरण होय.

### उदारीकरणासाठीचे उपाय :

१) **व्याजदरातील लवचिकता :** उदारीकरणाच्या धोरणांतर्गत व्यापारी बँकांना बाजारातील मागणी व पुरवठ्यानुसार व्याजदर निश्चितीबाबत स्वातंत्र्य देण्यात आले.

२) **उद्योगांचा विस्तार करण्याचे स्वातंत्र्य :** उदारीकरणाच्या काळात उद्योगांना त्यांच्या उत्पादन क्षमतेत विविधता आणणे, उत्पादनाचा खर्च कमी करणे याबाबत मुक्तपणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. यापूर्वी उत्पादन क्षमतेच्या मर्यादा निश्चित करण्याबाबत सरकारकडून निर्णय घेतला जात होता. उद्योगाकडून या मर्यादेनुसार उत्पादन केले जात होते. सध्या मात्र उद्योगांना बाजाराच्या आवश्यकतेनुसार उत्पादनाच्या मर्यादा निश्चित करण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे.

३) **मक्तेदारी व निर्बंधित व्यापार कायद्याचे उच्चाटन (MRTP) :** ज्या कंपन्यांची मालमत्ता १०० कोटी व त्यापेक्षा जास्त होती त्यांना MRTP १९६९ च्या कायद्यानुसार उद्योग संस्था म्हटले जात होते या उद्योग संस्थांवर गुंतवणुकी संबंधीचे अनेक निर्बंध होते. आता या संस्थांना गुंतवणुकीचे निर्णय घेण्याबाबत स्वातंत्र्य आहे.

४) **विदेशी विनिमय नियंत्रण कायद्यात (FERA) सुधारणा :** विदेशी विनिमय नियंत्रण कायद्याऐवजी (FERA) विदेशी विनिमय व्यवस्थापन कायदा (FEMA) लागू झाला. परकिय चलन विनिमयावरील नियंत्रणे कमी झाल्याने आंतरराष्ट्रीय व्यापाराला प्रोत्साहन मिळाले.


५) **पायाभूत सुविधा खुली करणे :** देशी-विदेशी गुंतवणूकदार आता रेल्वे, रस्ते व वीज प्रकल्पांतील पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करू शकतात.

६) **विदेशी तंत्रज्ञानाला प्रोत्साहन :** उदारीकरणामुळे प्राधान्यक्रम असणाऱ्या उद्योगात विदेशी तंत्रज्ञानाला परवानगी देण्यात आली. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करण्यात व उद्योगाची स्पर्धात्मकता वाढण्यास मदत झाली.

७) **भारतीय प्रतिभूती नियमन मंडळाची स्थापना (SEBI) :** सेबीची स्थापना १२ एप्रिल १९९२ रोजी करण्यात आली. गुंतवणूकदारांचे हित व सुरक्षितता जपण्यासाठी प्रतिभूती बाजाराचा विकास करण्यासाठी तसेच प्रतिभूती बाजार नियंत्रित करण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले.

### ब) खाजगीकरण (Privatisation) :

**अर्थ :** खाजगीकरण म्हणजे मालकी हक्क बदलून किंवा मालकी हक्क न बदलता खाजगी व्यवस्थापन व नियंत्रणाला मान्यता देणे होय. सोप्या शब्दांत खाजगीकरण ही अशी प्रक्रिया आहे की जी, आर्थिक क्रियांमधील सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग घटवून खाजगी क्षेत्राच्या सहभागात वाढ घडवून आणते.



आकृती ९.२ : खाजगीकरण

### खाजगीकरणासाठीचे उपाय :

१) **निर्गुंतवणूक :** यामध्ये सार्वजनिक क्षेत्राचे भागभांडवल खाजगी क्षेत्राला विकले जाते. उदा. मारुती उद्योगातील निर्गुंतवणूक, ITDC हॉटेल्स, IPCL,VSNL इत्यादी.

२) **अनारक्षण धोरण :** १९५६ च्या औद्योगिक धोरणामध्ये १७ उद्योग आरक्षित ठेवण्यात आले. नवीन आर्थिक धोरणाने हा आकडा ८ वरून तो हळूहळू तीनवर आणि आता तीनवरून दोन वर आला. सध्याच्या परिस्थितीत फक्त दोन उद्योग, रेल्वे वाहतूक व अणुऊर्जा सार्वजनिक क्षेत्राकडे आरक्षित आहेत.

३) **औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाची स्थापना (BIFR) :** नवीन आर्थिक धोरणाने औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाची स्थापना करून आजारी सार्वजनिक उद्योगांबाबत निर्णय घेण्याचे ठरविले. १९९६ च्या शेवटी १८८ आजारी सार्वजनिक उद्योग, औद्योगिक व वित्तीय पुनर्रचना मंडळाकडे सोपविण्यात आले.

४) **राष्ट्रीय नूतनीकरण मंडळाची (NRB) निर्मिती :** जेव्हा तोट्यात चालणारे सार्वजनिक उद्योग बंद केले जातात तेव्हा त्यात काम करणारे कामगार बेकार होतात. ही समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय नूतनीकरण मंडळाची निर्मिती झाली. हे मंडळ रोजगारातून काढण्यात आलेल्या कामगारांना व स्वेच्छा निवृत्ती घेणाऱ्यांना भरपाई देते.

**५) नवरत्नांचा दर्जा :** १९९७-९८ मध्ये ९ सार्वजनिक क्षेत्र उद्योगांना निवडून त्यांना 'नवरत्नांचा' दर्जा देण्यात आला. या नवरत्नांना पूर्ण वित्तीय व व्यवस्थापनाची स्वायत्तता देण्यात आली. नवरत्न खालीलप्रमाणे आहेत.

१) IOC : इंडियन ऑईल कॉर्पोरेशन
२) ONGC : ऑईल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन
३) HPCL : हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
४) BPCL : भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
५) IPCL : इंडियन पेट्रोकेमिकल कॉर्पोरेशन लिमिटेड
६) VSNL : विदेश संचार निगम लिमिटेड
७) BHEL : भारत हेवी इलेक्ट्रीकल लिमिटेड
८) SAIL : स्टील ॲथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड
९) NTPC : नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन

सद्य:स्थितीत सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग (PSUs) मिनीरत्न आणि महारत्नमध्ये वर्गीकृत केले गेले आहे.

- **मिनीरत्न कंपनी :** भारत सरकारने २००२ मध्ये मिनीरत्न कंपनीची संकल्पना उदयास आणली. मिनीरत्न कंपनीची दोन भागांत वर्गवारी करण्यात आली.

  मिनीरत्न श्रेणी-१ : गेल्या तीन वर्षात या श्रेणीतील सार्वजनीक क्षेत्रातील कंपन्यांनी सातत्याने नफा मिळविला पाहिजे, तसेच त्यांच्या तीन वर्षाच्या शेवटच्या आर्थिक वर्षात करपूर्व नफा ₹ ३० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त असावा.

  मिनीरत्न श्रेणी-२ : सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना मिनीरत्न श्रेणी दोन असे म्हणतात. या श्रेणीत कंपन्यांनी मागील तीन वर्षांत सातत्याने नफा मिळविलेला असला पाहिजे, शिवाय त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन असला पाहिजे.

- **महारत्न कंपनी :** सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा विस्तार व्हावा, जागतिक पातळीवर त्यांचा सहभाग वाढावा तसेच बहुराष्ट्रीय कंपन्या म्हणून त्यांना दर्जा मिळावा या उद्देशाने २००९ मध्ये महारत्न कंपनीची संकल्पना उदयास आली.

**शोधा पाहू :**

महारत्न व मिनीरत्न दर्जा असलेल्या कंपन्यांची नावे शोधून काढा.

### क) जागतिकीकरण (Globalisation) :



आकृती ९.३ जागतिकीकरण

**अर्थ :** नवीन आर्थिक धोरणाचे अंतिम ध्येय जागतिकीकरणच होय. अधिक काटेकोरपणे सांगायचे झाले तर उदारीकरण आणि खाजगीकरणामुळे अंशत: अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाला चालना मिळाली आहे. जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्थेची निर्मितीच होय. वैश्विक अर्थव्यवस्था ही अशी सीमारहित अर्थव्यवस्था असते की जेथे नफा, वस्तू व सेवा, भांडवल, श्रम आणि तंत्रज्ञानाचा प्रवाह मुक्तपणे देशाच्या सीमापार जात असतो.

थोडक्यात असे म्हणता येईल की, जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्थेशी एकरूप करणे होय. यामध्ये मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीवरील सर्व बंधने काढून टाकली जातात.

**जागतिकीरणासाठीचे उपाय :**

१) **संख्यात्मक नियंत्रणाचे उच्चाटन :** आयात व निर्यातीवरील सर्व संख्यात्मक नियंत्रणाचे उच्चाटन करण्यात आले. प्रशुल्क दरात घट करण्यात आली. औद्योगिक वस्तूंवर लावण्यात येणारा आयात दर कमी करण्यात आला.

२) **विदेशी भांडवलाला प्रोत्साहन :** सरकारने आर्थिक क्षेत्र परकीय गुंतवणुकीसाठी खुले केले त्यामुळे विविध क्षेत्रांत परकीय गुंतवणूक सुरू झाली. भारतीय

अर्थव्यवस्था जागतिकीकरणास खुली झाली आहे.

३) **रुपयाची परिवर्तनशीलता :** रुपयाचा विनिमय दर लवचीक करण्यात आला. सर्व चालू खात्यावरील व्यवहारांबाबत रुपया पूर्णत: परिवर्तनशील करण्यात आला.

४) **विदेशी कंपन्यांचा सहभाग :** भारतीय कंपन्यांना विदेशी कंपन्यांसमवेत सहभागाची परवानगी देण्यात आली. उदा. मारुती सुझुकी, हिरो होंडा, टाटा कोरस हे लोह व स्टीलमध्ये दक्षिण आफ्रिकेत व्यवहार करतात.

५) **दीर्घकालीन व्यापार धोरण :** दीर्घकालीन आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी आंतरराष्ट्रीय धोरणात बदल करण्यात आला. या धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये :

१) उदारीकरणाचे धोरण

२) आंतरराष्ट्रीय व्यापारावरचे निर्बंधात घट.

३) विदेशी सहभागाला प्रोत्साहन

६) **निर्यातीला प्रोत्साहन :** नवीन निर्यात धोरणानुसार निर्यातदारांना विविध उत्तेजने देण्यात आली. निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्राची (SEZ) निर्मिती करण्यात आली.

**जरा आठवूया :**

१) उद्योगांचे सामाजिक उत्तरदायित्व (CSR) म्हणजे काय?

२) त्याचा समाजाला कसा उपयोग होतो?

## १९९१ च्या आर्थिक धोरणाची मूल्यमापन :

### यश :

१) **माहिती तंत्रज्ञानातील क्रांती :** जागतिकीकरणामुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती झाली आहे. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात त्याचे योगदान आहे. भारतीय सॉफ्टवेअर अभियंत्यांना अमेरिकेची संयुक्त संस्थाने, युनायटेड किंगडम, फ्रान्स इत्यादी देशांत मागणी वाढली आहे.

२) **वित्तीय सुविधांमध्ये सुधारणा :** खाजगी व विदेशी बँकांमुळे वित्तीय क्षेत्र हे अतिशय व्यावसायिक व स्पर्धात्मक बनले आहे. क्रेडिट कार्ड, ई-बँकींग इत्यादी सेवा अत्यंत जलदपणे ग्राहकांसाठी उपलब्ध झाल्या आहेत.

३) **शैक्षणिक दर्जात सुधारणा :** जागतिकीकरणामुळे भारतीय विद्यार्थ्यांना विदेशी उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळाले असून त्यासाठी लागणारे शैक्षणिक कर्ज, शिष्यवृत्ती व गरजेच्या सेवा उपलब्ध झाल्या आहेत.

४) **निर्यातीत वाढ :** भारतातील निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे. भारत फक्त पारंपरिक वस्तूंची निर्यात करत नसून यंत्रसामग्री, रसायने, संगणक इत्यादी सुद्धा निर्यात करतो. त्यामुळे आपल्या आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलात सुधारणा झाली आहे.

५) **पीक पद्धतीतील विविधता :** भारतीय शेतकरी पूर्वी फक्त मुख्य अन्नधान्य व नगदी पिकांची लागवड करत होते. परंतु जागतिकीकरणामुळे पिकांची रचना पारंपरिक वस्तूंपासून अपारंपरिक वस्तूंमध्ये बदलली आहे. ते आता फळांचे व फुलांचे उत्पादन, औषधी वनस्पतीं इत्यादींची देखील लागवड करतात.

६) **दुर्मिळतेच्या समस्येवर मात :** आयातीच्या उदारीकरणामुळे वस्तू व कच्च्या मालाची दुर्मिळतेची समस्या सुटली आहे. यामुळे चलनवाढीची समस्या सोडविण्यास मदत झाली आहे.

### अपयश :

१) **स्वयंपूर्णतेचा अभाव :** जो देश जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आहे त्याला अन्नाच्या उत्पादनामध्ये स्वयंपूर्णतेचा अभाव आढळतो कारण तो देश अशा वस्तूंचे उत्पादन करतो ज्यांची जागतिक पातळीवर मागणी असून ते फायदेशीर आहेत.

२) **देशांतर्गत बाजाराचा दुष्परिणाम :** उदारीकरण व जागतिकीकरणामुळे देशान्तर्गत बाजारावर दुष्परिणाम झाला आहे. आयात केलेल्या वस्तूंची उपलब्धता जास्त आहे. आयातीच्या उदारमतवादी धोरणामुळे आयात केलेल्या वस्तू देशात उत्पादन झालेल्या वस्तूंपेक्षा कमी किमतीच्या असतात. त्यामुळे त्यांना प्रचंड मागणी असते.

३) **गरीब शेतकऱ्यांवर परिणाम :** जागतिकीकरणाचे फायदे श्रीमंत शेतकरी अनुभवत आहेत. ते निर्यातयोग्य पिकांची लागवड करतात, परंतु गरीब

शेतकऱ्यांची दखल घेतली जात नाही. त्यामुळे त्यांना जमीन विकण्यासाठी दबाव आणला जातो किंवा ते आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतात. तसेच कर्जबाजारीपणा व दारिद्र्याला सामोरे जातात.

४) **निकोप स्पर्धेचा अभाव :** भारतीय उद्योजक बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नाहीत. याचाच परिणाम हे उद्योग आजारी पडतात, बंद केले जातात किंवा विकण्यासाठी दबाव आणला जातो.

५) **कल्याणकारी दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष :** नफ्याच्या हेतूमुळे आरोग्य, संपर्क साधने, शिक्षण याकरिता प्रचंड प्रमाणात विविध शुल्कात वाढ झाली आहे. त्यामुळे कल्याणकारी दृष्टिकोन मागे पडला आहे.

६) **बेरोजगारी :** बहुराष्ट्रीय कंपन्यांशी स्पर्धा करू शकत नसल्याने बरेच भारतीय उद्योग बंद पडले आहेत म्हणून मोठ्या प्रमाणात कामगारांना कामावरून कमी केल्यामुळे बेरोजगारी, दारिद्र्य व विषमता यांमध्ये वाढ होत आहे.

## स्वाध्याय

### प्र. १. खालील विधाने पूर्ण करा :

१) स्वातंत्र्यानंतर भारताने ......... स्वीकार केला.
अ) समाजवादाचा ब) भांडवलशाहीचा
क) मिश्र/संमिश्र अर्थव्यवस्थेचा ड) साम्यवादाचा

२) नवीन आर्थिक धोरणाने विदेशी तंत्रज्ञानाला ...मान्यता दिली.
अ) कुटीरोद्योग ब) लघुउद्योग
क) सूक्ष्म एजन्सी ड) उच्च प्राधान्य उद्योग

३) सद्यास्थितीत सार्वजनिक क्षेत्रासाठी आरक्षित उद्योगांची संख्या ......... इतकी झाली आहे.
अ) ३ ब) ५ क) ७ ड) २

### प्र. २. विधान आणि तर्क प्रश्न :

**१) विधान 'अ' :** उदारीकरणांतर्गत उद्योगांचे परवाना वितरण करणे ही एक महत्त्वाची पायरी आहे.

**तर्क 'ब' :** अनावश्यक नियंत्रणे आणि प्रतिबंधामुळे १९९१ पूर्वी आर्थिक स्थिरता होती.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**२) विधान 'अ' :** १९९०-९१ च्या दरम्यान भारताला परकीय गंगाजळीचा (चलन) तीव्र तुटवडा होतो.

**तर्क 'ब' :** आयात कोटा आणि आयात शुल्क यांमुळे आयातीमध्ये वाढ झाली.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**३) विधान 'अ' :** उदारीकरणानंतर देशांतर्गत वस्तूंची विक्री वाढली.

**तर्क 'ब' :** उदारमतवादी धोरणामुळे परकीय वस्तूंच्या मागणीत वाढ होऊन आयात वाढली.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**४) विधान 'अ' :** जागतिकीकरणामुळे देश अन्नधान्य उत्पादनामध्ये स्वयंपूर्णता प्राप्त करू शकला नाही.

**तर्क 'ब' :** जागतिकीकरणामुळे माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती झाली आहे.

**पर्याय :** १) विधान 'अ' सत्य आहे, परंतु विधान 'ब' असत्य आहे.
२) विधान 'अ' असत्य आहे, परंतु विधान 'ब' सत्य आहे.
३) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
४) विधान 'अ' आणि 'ब' दोन्ही सत्य आहे आणि विधान 'ब' हे विधान 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.

**प्र.३. विसंगत शब्द ओळखा :**

१) नवीन आर्थिक धोरण –
उदारीकरण,खाजगीकरण, विमुद्रीकरण, जागतिकीकरण

२) उद्योगांना अनिवार्य परवाना असणारे उद्योग–
मादक पेय, निर्यात वस्तू, सिगारेट्स, औद्योगिक स्फोटके

३) नवरत्नांचा दर्जा असलेले धोरण–
SPCL, IOC, ONGC, HPCL

४) उदारीकरणाचे उपाय–
MRTP, FERA, SEBI, NTPC

**प्र. ४. खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून स्पष्ट करा :**

१) भारतात आता अनेक प्रकारच्या आणि कंपन्यांच्या मोटारी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

२) भारतातील काही सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे भागभांडवल खाजगी क्षेत्रास विकण्यात आले आहे.

३) भारतातील उद्योग क्षेत्रात परकीय गुंतवणुकीस आता मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले आहे.

**प्र. ५. खालील विधानाशी सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा :**

१) उदारीकरणामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळाली.

२) सरकारने खाजगी उद्योगांना सार्वजनिक क्षेत्रात मुक्त प्रवेश दिला.

३) विमा क्षेत्रात सरकारची मक्तेदारी आहे.

४) राष्ट्रीय नूतनीकरण मंडळाची (NRB) निर्मिती दारिद्र्य हटविण्यासाठी करण्यात आली.

५) इंडियन ऑईल कॉर्पोरेशन (IOC) उद्योग नवरत्नांपैकी एक सार्वजनिक उद्योग आहे.

**प्र. ६. खालील प्रश्नांची सविसतर उत्तरे लिहा :**

१) नवीन आर्थिक धोरणाची वैशिष्ट्ये सांगा.

२) जागतिकीकरणासाठी केलेल्या उपाययोजना स्पष्ट करा.

**प्र. ७. खालील उतारा काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तरे द्या.**

दुग्धव्यवसायावर आधारित भारतीय आइस्क्रीम उद्योग हा अतिशय जलदगतीने वाढणारा उद्योग आहे. भारतातील आइस्क्रीमचा दरडोई उपभोग/वापर इतर देशांच्या तुलनेत कमी आहे. भारतात दरडोई उपभोग ४०० मिली आहे तर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात २२००० मिली आणि चीनमध्ये ३००० मिली आहे. भारतातील आइस्क्रीमचा दरडोई उपभोग कमी असण्याचे कारण भारतीय बनावटीचे मिठाईचे पदार्थ आहेत. भारतात शंभरपेक्षा जास्त प्रकारच्या मिठाई तयार होतात. परदेशात मात्र आइस्क्रीम आणि पेस्ट्रीज असे दोनच पदार्थ वापरतात.

जागतिकीकरणाच्या आजच्या युगात, लोकांचे मतपरिवर्तन सातत्याने होत आहे. भारतात आता अनेक परदेशी आइस्क्रीम बनवणाऱ्या उद्योगांनी पाय रोवले आहेत. त्यांनी अनेक दुकाने थाटली असून वेगवेगळ्या प्रकारच्या व स्वादाच्या आइस्क्रीम्समुळे युवावर्ग आकर्षित होत आहे. याशिवाय प्रभावी वितरण व्यवसायसुद्धा आहे.

शीतगृहांच्या साखळीतील पायाभूत सुविधांमध्ये झालेली वाढ, भारतीयांच्या क्रियाशील मिळकतीत झालेली वाढ आणि भारतीयांच्या राहणीमानात जीवनमानात झालेले बदल यांमुळे आइस्क्रीम उद्योगाला चांगले भविष्य लाभले आहे. तथापि, आइस्क्रीमवरील कर जास्त आहेत. आइस्क्रीमवर सुमारे १८% वस्तू सेवाकर आहे, तर बटर, चिजसारख्या इतर दुग्ध पदार्थांवर केवळ १२% वस्तू सेवाकर लागतो.

आइस्क्रीम उद्योगाने २०१६–१७ या आर्थिक वर्षात १.५ अब्ज अमेरिकी डॉलर एवढा महसूली व्यवसाय केला आहे. या व्यवसायातून प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर्मचाऱ्यांची संख्या पंधरा लाख आहे. दुग्ध व दुग्धप्रक्रिया उद्योगांपैकी आइस्क्रीम उद्योग हा सर्वांत मोठा कर्मचारी संख्या असलेला उद्योग आहे.

१) भारतात आइस्क्रीमचा दरडोई उपभोग कमी असण्याचे कारण कोणते?

२) जागतिकीकरणाचा भारतीय आइस्क्रीम उद्योगावरील परिणाम सांगा?

३) भारतातील आइस्क्रीम उद्योगाच्या वाढीस पोषक घटक कोणते ते शोधा.

४) भारतातील आइस्क्रीम उद्योगावर लादलेल्या वस्तूसेवा कराचे परिणाम तुमच्या शब्दात मांडा.

◈◈◈